INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

# राजा राममोहन रॉय यांच्या कार्याचा ऐतिहासिक अभ्यास

प्रा. अरुण बी. आलेवार
इतिहास विभाग प्रमुख
डॉ.अरुण मोटघरे महाविद्यालय
कोंढा -कोसरा ,ता.पवनी ,जि. भंडारा.
मो.क्र. 8698863893
इमेल आयडी arunalewar203@gmail.com

**सारांश :-**

राजा राममोहन रॉय हे भारतातील प्रबोधन चळवळीतील प्रणेते मानले जातात.त्यांनी विविध धर्माचा अभ्यास करून भारतीय समाजातील बुरसटलेल्या प्रथांचा विरोध करून नाहीसे करण्याचा प्रयत्न केले.ब्राम्हो समाज स्थापन केले.त्यातून त्यांनी एकेश्वरवादाचे तत्त्व,पाशिमात्य शिक्षण आणि भारतीय परंपरांचा योग्य समन्वय साधण्याचा प्रयत्न केले.त्यांनी पाश्चिमात्य शिक्षणाला चालना दिल्याने समाजात नवजागरणाला सुरुवात झाली.राजा राममोहन रॉय यांचे सामाजिक,धार्मिक,शैक्षणिक,साहित्य आणि पत्रकारिता क्षेत्रात दिलेल्या योगदानामुळे भारताचा आधुनिक इतिहास घडला. त्यांचे राजकीय आर्थिक विचार समाजाला लाभदायक ठरले. भारतात त्यांच्या कार्यामुळे परिवर्तन घडून येण्यास सुरुवात झाली.त्यांच्या कार्याने भारतात प्रबोधन चळवळ देशाच्या विविध भागात पोहचली.ज्यामुळे भारताला एक प्रगत व जागरूक राष्ट्र बनण्याची वाट तयार करून दिली.

**बीजशब्द :-** सामाजिक सुधारणा, धार्मिक सुधारणा,शैक्षणिक सुधारणा,

## प्रस्तावना:-

भारताच्या इतिहासात सामाजिक, धार्मिक,शैक्षणिक सुधारणा घडवून आणण्यात अनेक महान सुधारकांनी आपला खारीचा वाटा उचलला आहे.त्यांनी केलेल्या कार्यामुळे भारतात परिवर्तन घडून आले.अशा महान सुधारकांमध्ये

राजा राममोहन रॉय यांचा अग्रक्रम लागतो.त्यांनी भारतात १९ व्या शतकात प्रबोधनाचा पाया घातला. इंग्रजांच्या वर्णद्वेषी धोरणामुळे भारतीय लोकांमध्ये असंतोष निर्माण झाला.भारतीय समाज जुन्या बुरसटलेल्या प्रथा, अंधश्रद्धा,कर्मकांड,अस्पृश्यता,जातीभेद आणि विषमता यामुळे समाज मागासलेला होता.अशा या समाजात परिवर्तन घडवून आणण्याचे शिवधनुष्य राजा राममोहन रॉय यांनी उचलले.भारतीय तरुणांनी पाश्चिमात्य शिक्षण घेतल्यानंतर भारतीय समाजात असलेले दोष स्पष्टपणे दिसून आले.राजा राममोहन रॉय हे उच्चविद्याभूषित होते.त्यांनी बंगालमध्ये असलेल्या परिस्थितीचे अवलोकन करून आपल्या कार्याची दिशा निश्चित केली.त्यांनी समाजात असलेल्या चालीरीती,परंपरा,जुन्या विचारांच्या विरोधात त्यांनी जो लढा दिला,तो केवळ एका व्यक्तीचा प्रयत्न नसून एका नव्या युगाची नांदी होती.धर्माचा आधार घेऊन तत्कालीन भारतात प्रचलित असलेल्या सती प्रथेचा कडाडून विरोध केला. ही प्रथा बंद व्हावी यासाठी ब्रिटीशांकडे पाठपुरावा करून ही प्रथा कायद्याने बंद केली.पारंपारिक शिक्षणापेक्षा इंग्रजी भाषेतील आधुनिक वैज्ञानिक शिक्षण भारताच्या प्रगतीसाठी महत्वाचे आहे.म्हणून त्यांनी भारतात पाश्चिमात्य शिक्षणाचे समर्थन करून बंगाल प्रांतात अनेक शिक्षण संस्था स्थापन केल्या.तसेच पुरुषांबरोबर स्त्रियांना शिक्षित करण्यासाठी प्राधान्य दिले. यावरच थांबले नाहीत तर स्त्रियांना त्यांचे हक्क मिळावे यासाठी संघर्ष केले.युरोपमध्ये सुरु असलेल्या उदारमतवादी धर्म सुधारणेच्या धर्तीवर हिंदू धर्मातील वाईट चालीरीतींचे उच्चाटन करावे आणि हिंदू धर्माचे शुद्धीकरण करावे या उद्देशाने त्यांनी सन १८२८ मध्ये ब्राम्हो समाजाची स्थापना केली.त्यातून त्यांनी भारतात असलेल्या बहुपत्नीत्व पद्धती आणि अस्पृश्यतेला विरोध करून आंतरजातीय विवाहाचे समर्थन केले. अशाप्रकारे त्यांनी आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्वपूर्ण योगदान दिले.सदर शोधनिबंधात राजा राममोहन रॉय यांच्या सामाजिक, धार्मिक,शैक्षणिक आणि इतर कार्याचा ऐतिहासिक अभ्यास करण्यात आला आहे.

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

१) राजा राममोहन रॉय यांच्या जीवन कार्याचा अध्ययन करणे.

२) त्यांच्या समग्र कार्याचा अध्ययन करणे.

३) पत्रकारिता, साहित्य आणि ब्राम्हो समाजाचा आढावा घेणे.

४) त्यांच्या कार्याचा आधुनिक भारतीय समाजावर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास

करणे.

**गृहितके:-**

१) राजा राममोहन रॉय यांच्या यांच्या समग्र कार्याने भारतात आधुनिक युगाला
सुरुवात झाली.

२) त्यांनी स्त्री शिक्षण व स्त्रियांच्या हक्कांसाठी प्रभावी कार्य केले.

३) त्यांच्या कार्याने अनेक वाईट प्रथा काही प्रमाणात कमी झाल्या.

४) त्यांच्या कार्याने भारतातील सुधारकांना कार्य करण्याची प्रेरणा मिळाली.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

सदर शोधनिबंधात १८ व्या व १९ व्या शतकातील सामाजिक सुधारणेचा आढावा घेण्यात येणार आहे.तसेच राजा राममोहन रोय यांनी केले कार्य यावर प्रकाशहृजोत ब्राम्हो समाजाच्या कार्याचा ऐतिहासिक अभ्यास क

संशोधन पद्धती:- प्रस्तुत शोधनिबाधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आले आहे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.तसेच प्राथमिक आणि दुस्यम साधनाचा आधार घेण्यात आलेला आहे.

## राजा राममोहन रॉय याचे पूर्वचरित्र :-

राजा राममोहन रॉय यांचा जन्म २२ मे १७७२ ला राधानगर या ठिकाणी झाला.त्यांच्या वडिलाचे नाव रामकांत आणि आईचे तारीणीदेवी हे नाव होते.त्यांचे पूर्वज हे ढाक्याच्या नबाबाच्या दरबारी अधिकारी पदावर होते.त्यांचे वडील जमीनदार होते.अतिशय सज्जन आणि वृत्तीने अतिशय धार्मिक होते.एकूणच घरातील धार्मिक वातावरणात त्यांचे बालपण गेले.तत्कालीन बंगाल प्रांतात धार्मिक कर्मकांडाचे स्तोम माजले होते.शालेय शिक्षण घेत असताना त्यांना आजूबाजूची परिस्थिती लक्षात आली. त्याच्या बालपणात बंडखोर वृत्ती दिसून आली. त्यांनी बंगाली ,अरबी,संस्कृत,इंग्रजी , आणि फारशी अशा बारा भाषेवर प्रभुत्व मिळविले होते.राजा राममोहन रॉय यांची कुशाग्र बुद्धिमता होती. त्यांनी वेद,विद्या,उपनिषदे अनेक साहित्य वाचन केल्याने सखोल ज्ञान मिळविले.वैदिक दर्शनांचा अभ्यास केले.त्यांनी भारतीय समाजातील रूढी परंपरा यांचा विरोध केला.. त्यानंतर त्यांनी इंग्रजी प्रशासनात नौकरी पत्करली.नौकरीच्या कालावधीत त्यांना रामगड,जेसोर,भागलपूर,रंगपूर इत्यादी ठिकाणी काम करायला मिळाले.त्यामुळे त्यांना इंग्रजी प्रशासनाचा जवळून अनुभव आला.या दरम्यान अनेक पंडितांशी त्यांचा संपर्क आला.त्यांचे पंडितांशी मतभेद झाले.मोठ्या भावाच्या निधानंतर वहिनीला सती जावे लागले.या घटनेचा त्यांच्या मनावर फार मोठा परिणाम झाला.त्यांनी वयाच्या ४० वर्षी सरकारी नौकरीचा राजीनामा देऊन कोलकत्ता या ठिकाणी स्थायिक झाले.त्यांनी लेखनाबरोबर समाजसुधारणेचे कार्य सुरु केले.१८१५ ला त्यांनी आत्मीय सभेची स्थापना केली. त्यातून समाजसेवेला सुरुवात केली.

## सामाजिक कार्य :-

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

राजा राममोहन रॉय यांच्या काळात भारतीय समाजात रूढी ,परंपरा ,अंधश्रद्धा ,कर्मकांड ,जातीव्यवस्था यात गुरफटलेला होता.सती प्रथा ,बालविवाह यासारख्या अनिष्ठ प्रथांना समाजाचा पाठींबा होता.ह्या प्रथा समाजातून हद्दपार करणे सहज शक्य नव्हते.त्यावेळी राजा राममोहन रॉय यांनी या प्रथेविरोधात आवाज उठवून जनजागृती केली. अशातच १८१२ ला त्यांचे थोरले बंधू जगमोहन यांचा मृत्यु झाला.त्यांच्या वहिनी आलोकमंजिरी ह्या सती गेल्या.या घटनेचा त्यांच्यावर फार मोठा परिणाम झाला. एकट्या बंगाल हजारो स्त्रियांना स्वतःचे जीव गमवावे लागते.हि बाब त्यांच्या मनाला पटणारी नव्हती.म्हणून त्यांनी सती प्रथेविरोधात जनमत बनविले.पाठींबा देणाऱ्या तरुणांचा पथक तयार केला.ह्या पथकातील तरुण सतीच्या ठिकाणी जाऊन विधवांचे प्राण वाचवू लागले. त्यांनी १८१८ मध्ये वृत्तपत्रातून सती प्रथाबद्दल लिहून हि प्रथा किती घातक आहे हे पटवून दिले.हि प्रथा कायद्याने बंद करण्यासाठी इस्ट इंडिया कंपनी कडे पाठपुरावा केला.हि प्रथा बंद करण्यासाठी व्हाईसरॉय वारन हेस्टीग्ज अनुकूल होते. सती प्रथा बंद व्हावी यासाठी लंडनमध्ये जाऊन चर्चा केली.४ ऑगस्ट १८२९ मध्ये लॉर्ड विलियम बेन्तिकाच्या काळात हि प्रथा कायद्याने बंद करण्याचा आदेश काढला.त्यांच्या या लढ्याला यश मिळाले.

त्याचप्रमाणे त्यांनी समाजात असलेल्या बुरसटलेल्या प्रथांना तिलांजली दिली.त्यांनी बहुपत्नीत्वाला आणि अस्पृश्यतेला विरोध केला.तसेच स्त्रीशिक्षण व आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला.१८२३ मध्ये त्यांनी 'हिंदू महिलांच्या हक्कावर अतिक्रमण' या नावाची माहिती पुस्तिकेत हिंदू स्त्रिला आपल्या वडिलाच्या आणि पतीच्या संपतीमध्ये अधिकार मिळाला पाहिजे.तसेच त्यांनी १८२७ मध्ये वज्रसुची नामक संस्कृत निबंधात जातीव्यवस्थेवर प्रखर टीका केली.अशाप्रकारे त्यांच्या सामाजिक कार्याने समाजात बदलाचे वारे वाहू लागले.

**धार्मिक कार्य :-**

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

राजा राममोहन रॉय यांनी विविध धर्माचा सखोल अभ्यास केले.विश्वधर्माचे त्यांनी केलेले समर्थन त्यांच्या विभिन्न धर्माच्या तौलनिक अभ्यासातून आले होते. धार्मिक विषयांवर अनेकांशी वादविवाद केले.राजा राममोहन रॉय यांनी अनेक देव-देवतांच्या पूजेला विरोध करून एकेश्वरवाद या संकल्पनेचा प्रसार केला. त्यांनी उपनिषदांच्या आधारे एकेश्वरवादाचे समर्थन केले.हिंदू धर्माचे शुद्धीकरण करण्यासाठी वेदांचा आधार घेत लोकांना जागृत केले.

राजा राममोहन रॉय यांनी १८१५ मध्ये आत्मीय सभा स्थापन केली.या सभेचा ब्रम्होपासना,अध्यात्मिक चर्चा ,प्रार्थना करणे यासंबधी जनतेत आवड निर्माण करणे हा मुख्य हेतू होता.यातून त्यांनी मुलांची विक्री प्रथा आणि जाती संस्था या विरोधात आंदोलन चालविले होते.तसेच स्त्रियांना संपत्तीचे हक्क मिळावे या साठी आपले प्रयत्न सुरु ठेवले होते.त्यांच्या या कार्याने काही मंडळी विरोध करीत होती.हिंदू धर्माची टिंगलटवाळी करणाऱ्या इंग्रजांचा खरपूस समाचार घेतला.या त्यांच्या कार्याने उच्चशिक्षित तरुण राजा राममोहन रॉय यांच्याकडे वळले.ख्रिश्चन मिशनरीचा हिंदू लोकांचे खिश्चन धर्मांतर करण्याचा डाव उधळवून लावला.त्यांनी हिंदू धर्मावर कधी टीका केली नाही, तर जुन्या बुरसटलेल्या प्रथा ह्या कालबाह्य आहेत हे त्यांनी दाखवून दिले.१८१९ मध्ये अनेक विरोधानंतर आत्मीय सभा बंद पडली.मात्र या सभेने हिंदू लोकांची धार्मिक श्रद्धा जागी केली.

१८२८ मध्ये त्यांनी ब्राम्हो ह्मो समाज ची स्थापना केली. ज्याचा उद्देश धार्मिक सुधारणा करणे आणि समाजात एकता प्रस्थापित करणे होते. या संस्थेद्वारे त्यांनी मूर्तीपूजा ,कर्मकांड आणि अंधश्रद्धेला छेद देत एकेश्वरवादाचा प्रचार आणि नैतिक जीवनावर भर दिला.

त्यांनी धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या अंधश्रद्धा, कर्मकांड आणि रूढींना तीव्र विरोध केला. त्यांनी तर्कशुद्ध आणि विवेकनिष्ठ धर्माची मांडणी केली.त्यांनी हिंदू, मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मातील चांगल्या तत्त्वांचा स्वीकार केला.सर्व

Received: 03-03-2026 | Accepted: 08-04-2026 | Published: 16-04-2026 | www.ijeml.com

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

धर्मांमध्ये समानता आणि एकता आहे, असा त्यांचा विश्वास होता.त्यांनी उपनिषद, वेद आणि इतर धार्मिक ग्रंथांचा अभ्यास करून त्यांचे सोपे भाषांतर केले, जेणेकरून सामान्य लोकांना धर्म समजावा.त्यांनी धर्माचा खरा अर्थ नैतिक जीवन, सत्य, आणि मानवतेची सेवा असा मांडला.राजा राममोहन रॉय यांनी धार्मिक कार्यातून हिंदू धर्माला अधिक प्रगतीशील आणि आधुनिक बनविण्याचा प्रयत्न केला.

**शैक्षणिक कार्य :-**

वर्षानुवर्ष अविद्येच्या निद्रेत असलेल्या भारतीय समाजाला जागे करण्यासाठी शिक्षण व्यवस्थेत बदल घडविणे महत्वाचे होते.ही बाब राजा राममोहन रॉय यांच्या लक्षात आली.म्हणूनच त्यांनी पाश्चिमात्य शिक्षणाचे समर्थन केले.कितीही भाषणे,लेख,कायदे करून आणि पुस्तके लिहून पाहिजे त्या सुधारणा होऊ शकत नाही.म्हणून त्यांनी शिक्षण सुधारणांकडे अधिक लक्ष दिले.त्याकाळी मुलांसाठी विविध धर्माच्या शाळा होत्या.त्यातून धार्मिक बाबी शिकविले जात होते.यामुळे मुलांचा विकास होत नाही असे त्यांच्या निदर्शनास आले.अनेक दोष असलेली शैक्षणिक व्यवस्था बदलाविण्यासाठी प्रयत्न केले.

राजा राममोहन रॉय यांनी गव्हर्नर जनरल लॉर्ड अम्हर्स्ट यांना पत्र लिहून पारंपरिक शिक्षणाऐवजी आधुनिक, वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध शिक्षण द्यावे अशी मागणी केली होती. त्यांनी इंग्रजी माध्यमातून गणित, विज्ञान, तत्त्वज्ञान यांसारख्या विषयांचे शिक्षण आवश्यक मानले.त्यांनी इंग्रजी भाषेच्या माध्यमातून पाश्चिमात्य ज्ञान भारतात आणण्याचा प्रयत्न केला.तसेच त्यांनी आधुनिक शिक्षण सर्वसामान्यापर्यंत पोहचविण्यासाठी पुढाकर घेतला होता. त्यांनी१८१७ मध्ये हिंदू कॉलेज स्थापनेत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.हे महाविद्यालय उदारमतवादी शिक्षणाचे केंद्रबिंदू ठरले. तसेच १८२२मध्ये सर डेव्हिड हेयर यांच्या मदतीने पहिली इंग्रजी शाळा काढली.या शाळेचा संपूर्ण खर्च त्यांनी स्वतः केला होता. डेव्हिड हेयर आणि रेव्ह. □डम हे व्यवस्थापनात

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

होते. इंग्रजी माध्यमांची शाळा असताना काही विषय बंगाली भाषेतून शिकविले गेले.

संस्कृतचे  अध्ययन आणि हिंदू एकात्मवादाच्या समर्थनासाठी१८२५ मध्ये त्यांनी वेदांत कॉलेजची स्थापन केली.भारतीय तत्वज्ञान आणि पाश्चात्य विज्ञान या दोन्ही विषयांचा समन्वय साधला.

त्यांनी फक्त इंग्रजीचा पुरस्कार केला नाही, तर त्यांनी बंगाली भाषेच्या विकासासाठी महत्वपूर्ण योगदान दिले.बंगाली भाषेत अनेक साहित्यांचे अनुवाद केले.

त्यावेळी समाजात स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली नव्हती.त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणाला पाठिंबा दिला.समाजातील स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी शिक्षण अत्यावश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले.त्यांनी संवाद कौमुदी या वृत्तपत्रातून सरकारला आवाहन करणारा लेख लिहिला.आर्थिक बाजू कमकुवत असलेल्या हिंदू मुलामुलींना निःशुल्क शिक्षण देण्याची मागणी केली.त्यांनी शिक्षणात रसायनशास्त्र, गणित विषयांचा समावेश करण्यासाठी जीवापाड मेहनत घेतली.

त्यांनी समर्थन केलेल्या पाश्चिमात्य शिक्षणामुळे भारतीयांना प्रशासकीय सेवेत प्रवेश घेण्यासाठी मार्ग मोकळे झाले. त्यांच्या या कार्यामुळे १९ व्या शतकातील द्रस्टे सुधारक म्हणून त्यांचा गौरव केला जातो.त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या अतुलनीय योगदानामुळे अनेक वर्षांनी भारतीय लोकांना त्याचा लाभ मिळाला.

हे कार्य करीत असताना त्यांनी वृत्तपत्रातून लोकांना जागृत केले.संवाद कौमुदी,मिरात -उल -अखबार ,बेंगाल हेराल्ड हि वृत्तपत्रे त्यांनी चालविली होती.या वृत्तपत्रातून त्यांनी अनेक प्रश्न मांडून ब्रिटीश सरकारचे लक्ष वेधले होते.त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला होता.तसेच त्यांनी वेदांतसार हा ग्रंथ बंगाली भाषेत लिहून १९१६ ला प्रसिद्ध केले.वेदांत आणि

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

उपनिषद ही त्याची पुस्तके बंगाली आणि इंग्रजी भाषेत प्रसिद्ध झाली होती.ती परदेशात वाचकांच्या पसंतीला उतरली होती.अशाप्रकारे बंगालमध्ये साहित्याचा पाया राजा राममोहन रॉय यांनी घातला.त्यानंतर अनेक ग्रंथ प्रकाशित झाले. राजा राममोहन रॉय यांनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी लावून धरली.फक्त केवळ भौतिक स्वातंत्र्य नको तर त्यांना बुद्धीचे,मनाचे आणि विचारांचे स्वातंत्र्य हवे होते.अशाप्रकारे त्यांनी स्वातंत्र्याची जणू मागणी करून भारताच्या स्वातंत्र्याचे बिगुल वाजविले.हि त्यांची मागणी भविष्याची नांदी ठरली.

तसेच त्यांनी राजकीय सुधारणांवर जोर देत भारतीय लोकांना प्रशासनात सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न केले.भारतीय लोकांना न्यायाधिकारी म्हणून नेमले पाहिजे असा युक्तिवाद हाउस ऑफ कॉमन्स मध्ये त्यांनी केला.१८२३ ला परवाना कायदा आणून ब्रिटीश सरकारने वृत्तपत्रावर बंदी घातली.तेव्हा त्यांनी सर्वोच्च न्यायालयात जाऊन दाद मागितली होती .तसेच त्यांनी ज्युरीबद्दल सुद्धा आवाज उठविला होता.त्यांनी बंगालमधील जमीनदारी पद्धतीतील दोषावर टीका करून शेतकऱ्यांचा कर कमी करण्याची मागणी लावून धरली होती.त्यांनी भारतीय लोकांच्या हक्काची मांडणी केली होती.

**निष्कर्ष :-**

१) राजा राममोहन रॉय हे केवळ समाजसुधारक नव्हते तर ते आधुनिक भारताचे प्रणेते होते.
२) त्यांनी केलेल्या सामाजिक,धार्मिक,शैक्षणिक कार्यामुळे समाजात परिवर्तन घडून आले.
३) सतीप्रथा निर्मूलनाचा कायदा झाल्याने स्त्रियांच्या स्थितीत बदल घडून सामाजिक दर्जा सुधारण्यास मदत झाली.
४) ब्राम्हो समाजाच्या माध्यमातून त्यांनी हिंदू धर्मातील कर्मकांड व मूर्तीपूजेला थारा न देता हिंदू धर्माचे शुद्धीकरण केले.
५) बंगाली भाषेतून साहित्य लेखन करून त्यांनी बंगाली भाषेला संरक्षण दिले.

६) त्यांनी वृत्तपत्रातील स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी दिलेला लढा भारताच्या स्वातंत्र्य चळवळीसाठी प्रेरणा देणारा ठरला.

७) त्यांच्या या कार्यामुळे महात्मा फुले आणि इतर समाज सुधारकांना कार्य करण्याची प्रेरणा मिळाली.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

१) कुरकुरे ल.भा.,राजा राममोहन रॉय,साकेत प्रकाशन पुणे, १ जानेवारी २००९.

२) टागोर सौमेंद्रनाथ ,भारतीय साहित्याचे निर्माते राजा राममोहन रॉय ,साहित्य अकादमी नवी दिल्ली,२०१२(मराठी अनुवाद )

३) दत्त के.सी .,राजा राममोहन रॉय जीवन और दर्शन ,लोकभारती प्रकाशन इलाहाबाद ,२०१०.(हिंदी )

४) चोपडा लक्ष्मेंद्र , राजा राममोहन रॉय,वाणी प्रकाशन ग्रुप,नई दिल्ली, २०२४

५) Mujumdar ,Jatindra Kumar (ed.),Raja Rammohan Roy and Progressive Movement in India : Selection from records 1803-1839 With an Historical introduction Art Press 1939

६) Mujumdar ,Jatindra Kumar (ed.),Raja Rammohan Roy and Progressive Movement in India:Selection from records 1775-1845 With an Historical introduction Art Press 1941

७) Chandar Jagdish, Manojkumar, Makers of Modern India Raja Rammohan Roy: Socio-Religious Reformer of India,Publish by The Readers Paradise New Delhi,2023, Ist Edition.